INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD)
© 2026 IJNRD | Volume 11, Issue 2, February 2026 | ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

# मराठी भाषेचा जागतिक प्रसार आणि आर्थिक परिणाम

संशोधक विद्यार्थिनी - दिपाली अरुण खर्डे
मराठी विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
भ्रमणध्वनी- ९०२८१९६२२९
ईमेल- dipalikharde19@gmail.com

**गोषवारा -**

मराठी भाषेचा जागतिक प्रसार हा महाराष्ट्र आणि जगभरातील मराठी भाषिक, समृद्ध संस्कृती तसेच स्थलांतरित लोक (अमेरिका, कॅनडा, युके, ऑस्ट्रेलिया) ऐतिहासिक स्थलांतर (मॉरिशस), डिजिटल माध्यम व सांस्कृतिक देवाण घेवाणीतून होतो. परदेशात स्थलांतरित झालेले मराठी भाषिक लोक सांस्कृतिक कार्यक्रम व शाळांच्या माध्यमातून आपली भाषा टिकवून ठेवतात. तिच्या समृद्ध संस्कृतीमुळे ती जगभरातील मराठी समुदायाला एकत्र आणते.असे असूनही जागतिकीकरणाच्या काळात ग्लोबल भाषा इंग्रजीचा प्रभाव वाढलेला असून मराठीसमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आहे. तरीही मराठीतील समृद्ध साहित्य व संस्कृतीमुळे तिचे महत्त्व कायम आहे. त्यामुळे मराठी भाषा ही जागतिक स्तरावर सांस्कृतिक आणि व्यावसायिक दुवा म्हणून काम करू शकते.

मराठी भाषेला अभिजात दर्जा, समृद्ध साहित्य आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. त्यामुळे ती जागतिक स्तरावर आपले स्थान बळकट करीत आहे. आर्थिकदृष्ट्या मराठी भाषिक समुदाय जागतिक अर्थव्यवस्थेत योगदान देतात. त्यामुळे भारत व यजमान देशांमधील संबंध दृढ होतात. त्यातून भाषिक ओळख आणि आर्थिक प्रगती साधली जाते. आर्थिक दृष्ट्या मराठीचा वापर उद्योग पर्यटन आणि साहित्य क्षेत्रात वाढवून रोजगाराच्या संधी निर्माण करता येतात. तसेच जागतिक स्तरावर मराठी भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि व्यावसायिक संबंध मजबूत करता येतात. तसेच मराठी भाषिकांमुळे शिक्षण, नोकरी,रोजगार,व्यवसाय, साहित्य, कला आणि डिजिटल क्षेत्रात आर्थिक मार्ग निर्माण झालेले आहेत. नोकरीच्या, रोजगाराच्या संधी वाढलेल्या आहेत. सांस्कृतिक उद्योगांना प्रोत्साहन मिळालेले आहे. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळालेली आहे.

विज्ञान तंत्रज्ञानाच्या मदतीने मराठी भाषा ज्ञान आणि व्यापाराची भाषा बनत आहे. तिला जागतिक स्तरावर ओळख मिळवण्यासाठी भाषिक स्वाभिमान व संवर्धनाची गरज आहे. त्यासाठी जागतिकीकरणाच्या या काळात मराठी भाषा ज्ञान भाषा बनून जागतिक व्यापार उद्योगांशी जोडली जाणे आवश्यक आहे. आर्थिक दृष्ट्या जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषेला ज्ञान आणि व्यापाराची भाषा म्हणून विकसित करणे गरजेचे आहे. त्यासाठी भाषेचे संवर्धन करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास मराठी केवळ सांस्कृतिक भाषा न राहता ती ज्ञानभाषा बनून जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावू शकते. थोडक्यात मराठी भाषेचा जागतिक प्रसार आणि जागतिक प्रसारामुळे होणारे आर्थिक परिणाम याचे विश्लेषण केलेले आहे.

## प्रस्तावना -

भारताने 1991 मध्ये खाऊजा म्हणजेच खाजगीकरण,उदारीकरण व जागतिकीकरण हे धोरण स्वीकारले आहे. जागतिकीकरण ही एक व्यापक संकल्पना आहे. त्यामुळे जगभरातील सर्वच क्षेत्रांवर जागतिकीकरणाचा प्रभाव आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा, या भाषेचा जागतिक प्रचार-महत्वाचा प्रसार, या भाषेचे संरक्षण,संवर्धन व तिचे आर्थिक परिणाम ही वैचारिक स्तरांवर चर्चिली जाणारी बाब आहे. कारण भाषेचे सांस्कृतिक महत्त्व अनन्यसाधारण असून भाषा, समाज, संस्कृती आणि साहित्य हे परस्परपूरक घटक आहेत. या घटकांच्या माध्यमातूनच देशाच्या प्रगती व अधोगतीचा आलेख रेखाटला जातो.

## गृहीतके -

१. मराठी भाषेच्या जागतिक प्रसारामुळे मराठी भाषेतील व्यवसाय अधिक सक्रिय होतील. २. मराठी भाषेतील साहित्य, कला, तंत्रज्ञान आणि व्यवसायातील सामग्रीचा प्रचार-प्रसार वाढल्यास जागतिक स्तरावर मराठी भाषेची मागणी वाढून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

३. नवप्रसारमाध्यमामुळे मराठी भाषेचा प्रसार होऊन सांस्कृतिक व आर्थिक अशा दोन्ही स्तरावर महाराष्ट्राचा प्रभाव वाढेल व एक मराठी भाषिक अर्थव्यवस्था विकसित होईल.

४. जागतिक 'ग्लोबल भाषा' म्हणून इंग्रजीच्या प्रभावामुळे पारंपारिक मराठी भाषा वापराला धोका निर्माण होऊ शकतो.

५. मराठी भाषेच्या जागतिक प्रसारामुळे जगभरातील मराठी भाषिक एकमेकांशी जोडले जातील. त्यामुळे मराठी भाषेचा जागतिक आवाका वाढेल.

६. जागतिक स्तरावर मराठी साहित्य, चित्रपट, संगीत, नाटक यासारख्या सांस्कृतिक कलाकृतींचे मार्केटिंग आणि प्रचार-प्रसार झाल्यास मराठी भाषेची ओळख वाढेल व सांस्कृतिक उद्योगांमध्ये रोजगार वाढेल.

७. मराठी भाषेच्या जागतिक प्रसारातून येणाऱ्या महसुलामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

८. जागतिक स्तरावर मराठी भाषिक ग्राहक आणि व्यावसायिक यांच्यातील संवादामुळे व्यापार वृद्धिगत होईल.

**विषयमांडणी** -

मराठी भाषा ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. परंतु जागतिकीकरणामुळे मराठी भाषेतसमोर अनेक आव्हाने उभी आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्यासाठी व जगभरातील इतर भाषांशी स्पर्धा करण्यासाठी मराठी भाषा समर्थ आहे का ?असा प्रश्न आज भेडसावतांना दिसतो आहे. मराठी भाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी मराठी भाषेचा विकास, प्रचार- प्रसार, भाषेची समृद्धी, व्यावसायिकता आणि अर्थाजन अशा सर्वच अंगांनी भाषेचा विचार करणे महत्वाचे आहे. कारण जागतिकीकरणाचे गृहीत तत्व स्पर्धा हे असून ते प्रभावी व विश्वव्यापी स्वरूपाचे आहे. मराठी भाषा ही निश्चितपणे या प्रभावक्षेत्राखाली आलेली आहे. भाषेसमोरील हे आव्हान पेलण्यासाठी मराठी भाषा समृद्ध झाली पाहिजे. त्यासाठी मराठी भाषेचा जागतिक प्रसार होणे महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत आपली मराठी भाषा, संस्कृती आपल्याला टिकवणे महत्त्वाचे आहे. कारण भाषा ही मानवी संस्कृतीचा आत्मा आहे.

एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाला सुरुवात झाली तेव्हा भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले होते की "जागतिकीकरणाच्या गदारोळात आपली भाषा आणि संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात येत आहे."१ मराठी संस्कृती, मराठी साहित्य आणि मराठी अस्मिता जपणाऱ्या समुदायाला जागृत करताना ते म्हणतात की "जगातल्या सगळ्या लहान मोठ्या समाजांना स्पर्श करणाऱ्या जागतिकीकरणासारख्या राक्षसी प्रक्रियांमधून काही उपयुक्त गोष्टीही आपोआप होऊन जातात. विशेषतः चालत आलेल्या कूचकामी गोष्टी ह्या निमित्ताने आपण तत्परतेने फेकून देतो आणि ह्याला केवळ निमित्त झालेल्या बाह्य-परक्या शक्तींना याचे श्रेय

इतिहासकार देतात. दुष्ट प्रवृत्तीवर मात करण्याची आंतरिक शक्ती सगळ्या परंपरांच्या गाभ्यात असतेच. ती फक्त काहीतरी निमित्ताची वाट पाहत असते. इंग्रजी संस्कृतीतून आपल्या सुधारणा घडल्या नाहीत. तर इंग्रजी वसाहत वादामुळे आपल्या पोटातून सुधारणा निर्माण झाल्या हे महाराष्ट्रात प्रकर्षाने घडल्याचे आपण पाहत आलो. अधिक मोठ्या प्रमाणावर आता जागतिकीकरण ह्याच प्रकारे कार्य करील. मात्र आपण आपल्या देशी भूमिकेवरून इंग्रजी प्रभाव पचवला. तीच देशी भूमिका जागतिकीकरणातही लावून धरली पाहिजे. कारण अशा परक्या प्रभावांच्या रणधुमाळीत आपली भाषा आणि संस्कृती तर देशीयतेशिवाय दुसरे कोणतेही शस्त्र मानवी इतिहासात सापडत नाही."२ यावरून आपल्याला लक्षात येते की, आपल्या जगण्यासाठी मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती अत्यंत गरजेची आहे.

भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून ते दळणवळणाचे साधन, भावनाभिव्यक्तीचे साधन तसेच पर्यायी संस्कृतीचे वाहक आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आज जगभरामध्ये आर्थिक सुबत्ता व सुकरता येत आहे. त्यामुळे जगभरातील अनेक भाषांचे भाषिक आकर्षण वाढलेले दिसून येते. परकीय भाषांचा प्रभाव मराठी भाषेवर पडलेला दिसून येतो. जगभरामध्ये इंग्रजी भाषेचा स्वीकार होत असून इंग्रजी शाळा, इंग्रजी संवाद हे गौरवास्पद व भूषणावह झालेले आहे. परकीय भाषेचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढीस लागलेली आहे. कोणतीही भाषा ही त्या देशाची संस्कृतीची ओळख असते. परंतु जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत मराठी भाषा व संस्कृती लोप पावण्याचा संभव असून नष्ट होण्याची शक्यता आहे. कारण केंब्रिज विद्यापीठातील तात्सुया आमानी यांनी आपल्या संशोधनात मांडले आहे की "जगतील २५ % भाषा या मृत्युशय्येवर आहेत. म्हणजेच भाषिक अवस्था अत्यंत बिकट आहे." तसेच इंग्रजी भाषेला जागतिक स्तरावर ग्लोबल भाषा म्हणून गौरविल्या जात आहे.त्यासंदर्भात मत व्यक्त करतांना नितीन केळकर एका ठिकाणी म्हणतात, "खरे तर इंग्रजी भाषेचे मराठीवरचे आक्रमण हे वसाहत काळापासूनच सुरू झालेले आहे. त्याबाबतची चिंता तत्कालीन विचारवंतांनाही सतावत होती. अशी स्थिती शे-दीडशे वर्ष चालली तर मराठी नुसतीस मिश्र वा भ्रष्ट नव्हे तर नष्ट होईल अशी भीती वि.का.राजवाडे यांनीही व्यक्त केली होती. शतकापूर्वी व्यक्त करण्यात आलेली ही भीती आज अधिकच गडद दिसते." नितीन केळकर यांच्या बोलण्यातले गांभीर्य समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. कारण जागतिकीकरणामुळे मराठीचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

मराठीकडे समाज पाठ फिरवतांना दिसून येत आहे. शिक्षणामध्ये मराठी भाषेचे,मराठी विषयाचे महत्त्व कमी झाले आहे. ते या जागतिकीकरणामुळे, 'ग्लोबल भाषा' इंग्रजीमुळे होय. मराठी जर धोक्यात असेल तर मराठी साहित्य, संस्कृती कशी टिकेल याचा गंभीरपणे विचार करून उपाय योजना करणे फार महत्वाचे आहे. त्यामुळे मराठी भाषिकांना आपली भाषिक अस्मिता जोपासणे तिचा जागतिक प्रचार-प्रसार करणे गरजेचे आहे.

मराठी ही महाराष्ट्र राज्याची राजभाषा व मातृभाषा आहे. त्यामुळे या माय मराठीवर कोणते संकट ओढवणार, जागतिकीकरणाच्या या वादळामध्ये मराठी भाषा आपले मूळ स्वरूप अस्तित्व टिकवू शकेल का?, जागतिकीकरण व मराठी यांचा संबंध काय?, मराठी भाषेच्या अस्तित्वालाच धक्का लागेल का?, जागतिक करणात ग्लोबल भाषाच समाज भाषेचे, मातृभाषेचे, बोलीभाषेचे स्थान घेईल का? असे अनेक प्रश्न मराठी भाषिकांच्या मनात भेडसावत आहे. इंग्रजी भाषेने समाजमनाचा ताबा घेतल्यामुळे मराठी भाषिकांच्या मनाची परिस्थिती केविलवाणी होत आहे. पण भाषिक आक्रमणे ही मराठी भाषेला नवीन नाही. आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे व प्रसार माध्यमांचे आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेची गरज व तिचे महत्त्व आपल्याला नाकारता येत नाही; असे असले तरी आपण आपल्या मातृभाषेला दुर्लक्षित न करता तिला सक्षम व समृद्ध केले पाहिजे. कारण भाषा नष्ट झाली तर भाषेबरोबर संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञान, नीतीमूल्ये व त्याचबरोबर देशही मरतो स्पर्धा हा जागतिकीकरणाचा हेतू असून स्पर्धे शिवाय गुणवत्ता नाही. त्यामुळे या स्पर्धेत मराठी भाषेचा वापर, तिची गुणवत्ता. मराठी भाषा वापराची सक्ती,मराठीतून शिक्षण, मराठी भाषेचा प्रचार-प्रसार अशा सर्वच अंगाने मराठी भाषेचा विचार करणे गरजेचे आहे. मातृभाषा हाच आपला प्राण आहे. त्यामुळे तिला समृद्ध व सक्षम करण्यासाठी तिचा जागतिक प्रसार करणे महत्त्वाचे किंवा गरजेचे आहे.

मराठी भाषेचा जागतिक प्रसार म्हणजे मराठी भाषा जगभरातील विविध देशांमध्ये पसरणे आणि तिचा वापर व विकास होणे होय. विशेषतः जगभरातील भारतीय स्थलांतरित समुदायांमध्ये मराठी भाषा टिकवून ठेवणे आणि तिला एक जागतिक भाषा म्हणून स्थान मिळवून देणे होय. त्यामध्ये मराठी भाषेतील साहित्य, माध्यम आणि तंत्रज्ञान यांचा वापर करणे महत्वाचे आहे. परकीय देशांमध्ये स्थलांतरित भारतीय मराठी भाषिक लोकांमुळे मराठी भाषेला जगभरात पोहोचवून हे लोक त्यांच्या स्थानिक समुदायांमध्ये मराठी भाषेचा वापर करतात आणि सांस्कृतिक संस्थांच्या माध्यमातून ती जपतात. त्यामध्ये मराठी चित्रपट,,

मालिका डिजिटल प्लॅटफॉर्म आणि नव समाज प्रसारमाध्यमे यासारख्या माध्यमांमुळे मराठी भाषेला आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक स्तरावर ओळख मिळत आहे. त्यामुळे परदेशातील लोकांमध्ये ही मराठी भाषेबद्दल जिज्ञासा व उत्सुकता निर्माण होत आहे.

मराठी भाषेला केवळ प्रादेशिक भाषा न ठेवता शिक्षण आणि ज्ञानाचे माध्यम म्हणून विकसित करणे गरजेचे आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तिला ज्ञानार्जनाचे स्थान मिळेल. मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांच्या जागतिक प्रसारामुळे जगाला मराठी भाषेची समृद्धता कळेल. इंग्रजीचा प्रभाव असला तरीही मराठी भाषेत आवश्यक बदल स्वीकारून तिला अधिक सशक्त करणे. जेणेकरून ती जागतिक स्तरावर टिकेल. मराठी भाषेचा जागतिक प्रसार करणे म्हणजे केवळ मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या वाढवणे नाही. तर त्या भाषेला अधिकाधिक समृद्ध करणे, तिचा वापर वाढवणे आणि जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर तिचे स्थान निर्माण करून तिचे अस्तित्व टिकून ठेवणे होय.

मराठी भाषिकांची मोठी लोकसंख्या, भाषेतील समृद्ध साहित्य आणि महाराष्ट्राचे आर्थिक सामर्थ्य यामुळे जागतिक बाजारपेठेत मराठी भाषेला महत्व आहे. मराठी भाषेच्या जागतिक प्रसारामुळे रोजगाराच्या आणि आर्थिक संधी वाढतात. जाहिरात, शिक्षण, तंत्रज्ञान आणि पर्यटन यासारख्या क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मितीच्या संधी वाढतात. मराठी भाषेत संवाद साधणाऱ्यांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे जागतिक स्तरावर या भाषेचा वापर करून व्यावसायिक आणि सांस्कृतिक संबंध अधिकाधिक घनिष्ठ करता येतात. महाराष्ट्र राज्य हे एक मोठे औद्योगिक आणि आर्थिक केंद्र आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांना मराठी भाषा येते त्यांना महाराष्ट्रातील औद्योगिक कंपन्यांमध्ये प्राधान्य मिळते. बँकिंग, विमा, उत्पादन, माहिती-तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्र यासारख्या उद्योगधंद्यांमध्ये मराठी भाषेची मागणी आहे. तसेच प्रादेशिक अर्थव्यवस्थेत मराठी भाषेचा वापर वाढल्याने स्थानिक व्यवसाय आणि उद्योगांना फायदा होतो.

मराठीतील सांस्कृतिक उद्योगामुळे जसे मराठी साहित्य, संगीत, नाटक, पुस्तके, कला, चित्रपट, डिजिटल कंटेंट यांच्या निर्मितीमुळे एक मोठी आर्थिक बाजारपेठ तयार झालेली आहे. त्याचबरोबर मराठी भाषेतील समृद्ध वारसा आणि संस्कृती पर्यटनाला चालना देते. या पर्यटनातून देशाला आर्थिक उत्पन्न मिळते. मराठी भाषा जेव्हा शिक्षण, तंत्रज्ञान, व्यवसाय आणि सरकारी कामकाजात ज्ञानभाषा बनते तेव्हा नोकरीच्या संधी वाढतात. मराठीतून शिक्षण घेणे, सेवा पुरविणे यासारख्या मराठीतून होणाऱ्या व्यवहारामुळे

अर्थव्यवस्थेला चालना मिळते. संगणक आणि इंटरनेटवर मराठीचा वापर वाढला तर मराठी भाषिक समाज डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्रिय किंवा सहभागी होईल.ज्यामुळे मराठी भाषिकांना नवीन व्यवसाय आणि आर्थिक व्यवहार करणे सहज शक्य होईल. दैनंदिन व्यवहारात आणि स्थानिक बाजारपेठांमध्ये मराठीचा वापर वाढल्यास स्थानिक उद्योगांना आणि सेवांना प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होऊन या अर्थव्यवस्था बळकट होतील. तसेच मराठी भाषेबद्दलचा अभिमान आणि अस्मिता वाढल्यास लोक मराठीत व्यवहार करण्यास प्राधान्य देतील. त्यामुळे मराठी भाषेवर आधारित सेवा आणि उत्पादनांची मागणी वाढेल. मराठी भाषेतील ज्ञान जगभरात पोहोचवून व इतर भाषेतील ज्ञान मराठीत भाषेत आणून भाषिक देवाणघेवाण वाढवता येईल व ज्ञानाचा प्रचार-प्रसार करता येईल.त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व देशाची प्रगती होईल.

## महत्त्वाचे मुद्दे -

**१. भाषिक अस्मिता व अभिमान -** मराठी भाषेच्या जागतिक प्रसारातून मराठीचे अस्तित्व टिकवून मराठी भाषिकांमध्ये भाषेबद्दलचा अभिमान व अस्मिता निर्माण करता येईल. त्यामुळे लोक मराठीत व्यवहार करण्यास प्राधान्य देतील आणि मराठी भाषेवर आधारित सेवा व उत्पादनाची मागणी वाढेल.

**२. ज्ञानाचा प्रसार -** मराठीतील ज्ञान जगभरात पोहोचवून व इतर भाषांमधील ज्ञान मराठीत आणून भाषिक देवाणघेवाण होईल. त्यामुळे ज्ञानाचा प्रचार-प्रसार होईल.

**३. ज्ञानभाषा म्हणून विकास -** मराठीतून शिक्षण आणि ज्ञानाचा व्यवहार वाढल्यास मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळतील. त्यामुळे राज्याला आर्थिक लाभ होईल. **४. शैक्षणिक आणि व्यावसायिक मागणी -** मराठी भाषेच्या जागतिक प्रसारामुळे परदेशातील विद्यापीठे आणि कंपन्यांमध्ये मराठीची शैक्षणिक व व्यावसायिक मागणी वाढेल. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**५. व्यावसायिक संधी -** मराठीच्या जागतिक प्रसारामुळे विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये मराठीचा वापर वाढल्यास मराठीतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाच्या संधी वाढतील.

**६. रोजगार संधी -** मराठी भाषेच्या जागतिक प्रसारामुळे कंटेंट निर्मिती, शिक्षण, तंत्रज्ञान, बँकिंग, विमा, सरकारी क्षेत्र, डबिंग, भाषांतर, पर्यटन आणि सांस्कृतिक उद्योगांमध्ये नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. त्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल.

**७. आर्थिक विकास -** मराठी भाषेच्या जागतिक प्रसारातून येणाऱ्या (मराठी भाषा, ॲप्स, ऑनलाइन कोर्सेस) महसुलातून राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व राज्याचा आर्थिक विकास होईल.

**८. व्यापार व व्यवसायात वाढ -** जागतिक स्तरावर मराठी भाषेचा प्रसार झाल्यामुळे मराठी भाषिक ग्राहक आणि व्यावसायिक यांच्यातील संवाद सोपा व सुलभ होऊन व्यापार व व्यवसायात वृद्धी होईल. त्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**९. डिजिटल माध्यम, नवसमाजमाध्यमे व स्थलांतर -** मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारामुळे जगभरातील मराठी भाषिक समाज डिजिटल माध्यम, नवसमाजमाध्यमे व स्थलांतर तसेच इंटरनेट, सोशल मीडिया, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हाट्सअप, मोबाईल, ब्लॉक, इंटरनेट यासारख्या अनेक माध्यमांद्वारे एकमेकांशी जोडले जातील. ज्यामुळे मराठी भाषेचा जागतिक आवाका वाढेल.

**१०. भाषेची ओळख व संस्कृती -** मराठी ही महाराष्ट्राची मायबोली आहे आणि ती तेथील लोकांची सांस्कृतिक ओळख आहे. तिच्या जागतिक प्रसारामुळे तिची जागतिक स्तरावर सांस्कृतिक ओळख निर्माण होऊन संस्कृतीचा प्रचार-प्रसार होईल.

**११. सांस्कृतिक निर्यात -** मराठी साहित्य, चित्रपट, नाटक आणि संगीत यासारख्या कलाकृतींचे जागतिक स्तरावर मार्केटिंग आणि प्रचार-प्रसार झाल्यास भाषेची ओळख व सांस्कृतिक निर्यात वाढेल.

**१२. उद्योग व्यवसायात वाढ -** महाराष्ट्रातील बाजारपेठेसाठी मराठी भाषेतील जाहिराती, सेवा आणि उत्पादने आवश्यक आहे. त्यामुळे राज्याच्या उद्योग व्यवसायात वाढ होईल व राज्याची आर्थिक उलाढाल वाढेल.

**१३. प्रादेशिक अर्थव्यवस्था -** मराठी भाषेचा वापर वाढला तर स्थानिक व्यवसाय व उद्योगांमध्ये वाढ होऊन प्रादेशिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. त्यामुळे प्रादेशिक अर्थव्यवस्था मजबूत, बळकट होईल.

**१४. पर्यटन व आर्थिक लाभ -** मराठी भाषेतील समृद्ध वारसा आणि संस्कृतीमुळे पर्यटनाला चालना मिळेल व पर्यटनातून देशाला आर्थिक लाभ होईल.

**१५. शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्र -** विज्ञान व तंत्रज्ञानाचे शिक्षण मराठीतून उपलब्ध करून दिल्यास ते अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून मराठीला जागतिक स्तरावर शैक्षणिक महत्व प्राप्त होईल. तसेच मराठी विद्यार्थ्यांना नोकरी व व्यवसायाच्या संधी निर्माण होतील. **१६. सांस्कृतिक उद्योगांची वाढ -** मराठीतून साहित्य, चित्रपट, संगीत,नाटक आणि कलाक्षेत्रात मोठ्या प्रमाणात निर्मिती होऊन सांस्कृतिक उद्योगांना व्यावसायिक स्वरूप प्राप्त होईल. व त्यातून रोजगार निर्मिती वाढेल.

**१७. ज्ञानभाषा म्हणून विकास -** जागतिकीकरणामुळे मराठीला केवळ प्रादेशिक भाषा न ठेवता शिक्षण व ज्ञानाचे माध्यम म्हणून विकसित करणे. जेणेकरून ती जागतिक स्तरावर ज्ञानाची भाषा बनेल. तसेच मराठीतून शिक्षण आणि ज्ञानाचा व्यवहार वाढल्यास मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळतील. त्यामुळे देशाला व राज्याला आर्थिक लाभ होईल.

**१८. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना -** दैनंदिन व्यवहार व स्थानिक बाजारपेठांमध्ये मराठीचा वापर वाढल्यास स्थानिक उद्योगांना व सेवांना प्रोत्साहन मिळून ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतील व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**१९. डिजिटल अर्थव्यवस्था -** संगणक आणि इंटरनेट मध्ये मराठीचा वापर वाढल्यास मराठी भाषिक समाज डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्रिय होऊन मराठी भाषिकांना नवीन व्यवसाय आणि आर्थिक व्यवहार करणे शक्य होईल.

मराठी भाषेच्या जागतिक प्रसारामुळे साहित्य आणि कला क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. तसेच तंत्रज्ञान आणि संशोधनात देशाची प्रगती होईल. भाषिक सेवांची मागणी वाढेल. सांस्कृतिक देवाण-घेवाण,तंत्रज्ञान, दळणवळण, भाषेतील बदल, सांस्कृतिक प्रभाव,अर्थव्यवस्थेत भरभराट, अंतर्गत अंतर-उद्योग संबंध, आर्थिक विषमता, जागतिक बाजारपेठेत मराठीला स्थान, जागतिक स्तरावर ज्ञान भाषेचे स्थान व विकास, मराठी साहित्य आणि संस्कृतीचा प्रचार-प्रसार, मराठी भाषेच्या समृद्धतेची ओळख, उद्योग व्यवसायात वाढ व व्यवसायाचा विस्तार, सांस्कृतिक आणि भाषिक वारसा, शैक्षणिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात

ज्ञान, वाचन आणि लेखन संस्कृती रुजवणे व जोपासणे,नवीन प्रभावी आणि दर्जेदार साहित्य निर्मिती यासारख्या अनेक घटकांचा विचार करणे मराठी भाषेचा जागतिक प्रसार आणि आर्थिक परिणामाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

## समारोप

थोडक्यात मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारामुळे मराठी भाषा आणि संस्कृती समृद्ध होते. तसेच भाषिक अस्मिता जपली जाते. मराठी भाषेचे संरक्षण व संवर्धन केले जाते. भाषेचे अस्तित्व टिकून तिला जागतिक स्तरावर महत्व किंवा स्थान मिळवून दिले जाते. मराठी भाषेचा प्रसार हा केवळ भाषिक नसून तो एक महत्त्वाचा आर्थिक व सामाजिक घटक आहे. जो महाराष्ट्राच्या व देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. आर्थिक व्यवहार, शिक्षण, साहित्य, तंत्रज्ञान, भाषिक अस्मिता, साहित्य निर्मिती, संस्कृती व भाषा यांचे सांस्कृतिक जतन संरक्षण आणि संवर्धन यासारख्या अनेक कारणांसाठी मराठी भाषेचा जागतिक प्रसार महत्वाचा असून आवश्यक आहे.

## निष्कर्ष

१. मराठी भाषेचा जागतिक प्रसार केवळ भाषिक दृष्ट्याच नव्हे तर सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या ही महत्वाचा आहे. त्यामुळे भाषेचे वैभव टिकून राहते आणि मराठी संस्कृतीला जागतिक स्तरावर स्थान मिळते. तसेच व्यावसायिक आणि सांस्कृतिक संबंध दृढ होतात.

२. मराठी भाषेच्या प्रसारासाठी मराठीमध्ये अधिक वाचन आणि लेखन संस्कृती रुजवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मराठीचा दैनंदिन जीवनात, शासकीय ठिकाणी व सार्वजनिक ठिकाणी वापर करणे आणि मराठीत नवीन प्रभावी व दर्जेदार साहित्य निर्मिती होणे महत्त्वाचे आहे.

३. मराठी भाषेचा जागतिक प्रसार हा नवसमाजमाध्यमे, स्थलांतर, डिजिटल माध्यमांतून होत असून ही माध्यमे आर्थिकदृष्ट्या, सांस्कृतिक उद्योग आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची ठरत आहे.

४. मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी सर्वच क्षेत्रांमध्ये, व्यवहारात मराठीचा वापर झाला पाहिजे. व्यवसाय भिमुखतेशी मराठीची सांगड घातली पाहिजे.

५. जागतिकीकरणाचे आणि ग्लोबल भाषा इंग्रजीचे दूरगामी परिणाम मराठी भाषेवर झालेले दिसून येतात.

६. मराठी भाषेचा शासकीय स्तरावर वापर व सकारात्मक पाठिंबा असायला हवा तसेच मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे.

## संदर्भग्रंथ

१. नेमाडे भालचंद्र, 'साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण', लोकवाङ्मय प्रकाशन गृह,मुंबई,२००१,पृ.११४

२. देशपांडे विलास चिंतामण, 'अक्षरयात्रा', विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल सीताबर्डी,नागपूर, पृ.०८

३. डॉ. सौ अजमेरा सूर्यकांता, प्रा.उपवर्ट विनोद 'जागतिकीकरण आणि मराठी भाषा', अथर्व पब्लिकेशन, धुळे

४. डॉ. देवळाणकर शैलेंद्र, 'समकालीन जागतिक राजकारण', विद्या बुक पब्लिकेशन,औरंगपुरा, औरंगाबाद

५. प्रा.डॉ.वले वासुदेव 'जागतिकीकरणाचा मराठी भाषा आणि साहित्यावरील प्रभाव',प्रशांत पब्लिकेशन,जळगाव

• **Copyright & License:**
© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.